पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) व विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांसाठी संगणक, प्रिंटर, कलर प्रिंटर, स्कॅनर, लॅपटॉप, Ms Office (perpetual) व Antivirus खरेदी **करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : खरेदी-२०२६/प्र.क्र.०२ /नोंदणी शाखा
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा</u>: -१) माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दि.१९.१२.२०२५ रोजीचे पत्र
२) शासन पत्र, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्रमांक खरेदी-२०२६/प्र.क्र.०२/नोंदणी शाखा, दि . १०.०२.२०२६.
३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. खरेदी-२०२६/प्र.क्र.०२/नोंदणी शाखा, दि . १२.०२.२०२६.
४) पुरवठा आदेश दि.३०.०३.२०२६.
५) RCS Infotech, नवी मुंबई या संस्थेचे दि.१३.०५.२०२६ चे देयक.

<u>प्रस्तावना :</u>

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) व विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांसाठी संगणक, प्रिंटर, कलर प्रिंटर, स्कॅनर, लॅपटॉप,Ms -office (perpetual) व Antivirus खरेदी करण्यासाठी मा. सचिव (सां.का.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५.०२.२०२६ रोजी प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत संदर्भ क्र.१ नुसार निश्चित केलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे संगणक, प्रिंटर, कलर प्रिंटर, स्कॅनर, लॅपटॉप, Ms -office (perpetual) व Antivirus खरेदी करण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समितीने संदर्भ क्र. २ नुसार मान्यता दिली आहे. यानुसार सदर खरेदीस संदर्भ क्र.३ नुसार रु.१,३०,४५,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तद्नंतर GEM Portal वर स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पाडून जादा दराच्या तथापि, सर्वात कमी दर (L-1) देणाऱ्या RCS Infotech, नवी मुंबई या संस्थेस संदर्भ क्र.४ नुसार रु.१,४८,८६,७००/- इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. या पुरवठा आदेशानुसार सदर संस्थेने वस्तुंचा पुरवठा केला असल्याने रु.१,४८,८६,७००/- इतक्या रक्कमेचे देयक संदर्भ क्र.५ नुसार सादर केले आहे. जादा दराच्या निविदेमुळे सदर वस्तुंच्या खरेदीची किंमत मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त होत असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) व विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांसाठी संगणक, प्रिंटर, कलर प्रिंटर, स्कॅनर, लॅपटॉप, Ms -office (perpetual) व Antivirus खरेदी करण्यासाठीच्या रुपये १,४८,८६,७००/- (अक्षरी रुपये एक कोटी अठ्ठेचाळीस लाख शहाऐंशी हजार सातशे फक्त) इतक्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खरेदीवरील होणारा खर्च मागणी क्र. झेडडी-१,२२५१-सेक्रेटरिएट-सामाजिक सेवा-०९०, सेक्रेटरिएट (०१) (०२) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतुद (कार्यक्रम), २२५१ ०८९३, १७-संगणक खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षाकरिता मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३ संदर्भ क्र.३ येथील मूळ प्रशासकीय मान्यतेमधील अटी/शर्ती पूर्वी प्रमाणेच कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.०४.२०१५ च्या शासन निर्णयानुसार वित्तीय अधिकार अधिनियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला, उपविभाग-२ मधील अनुक्रमांक २७-अ (७६) अनुसार प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व या विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीने दि. ०५.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१३०७२१०३४३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUMANT DINKAR PASHTE

Digitally signed by SUMANT DINKAR PASHTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS, 2.5.4.20=58694D4CD2BD16F0AB6514FC8598A9AA217E2508455856A701ADB1BB6EF9B120, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AFC006DAAE95D0F2CF7C7F09CA18CF0C9C9363A05E6070B1C03455CF1CB43586, cn=SUMANT DINKAR PASHTE
Date: 2026.08.13 13:08:08 +05'30'

(सुमंत दि. पाष्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व उप सचिव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. उप सचिव, नियोजन विभाग/वित्त विभाग/उदयोग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
६. संचालक, पुरातत्व व वस्तु संग्राहलय संचालनालय, मुंबई.
७. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई
८. संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई.
९. सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई.
१०. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२. महालेखापाल-१, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. महालेखापाल-२, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती, नोंदणी शाखा.